RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१९ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## रामलल्लाचे गर्भगृहात आगमन; पूजा-अर्चा, विधींनी भारले वातावरण

### वाराणसीचे आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड आणि त्यांचे सहकारी लक्ष्मीकांत वाजपेयी यांच्या नेतृत्वात पूजा

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

श्रीराम मंदिराच्या गर्भगृहात गुरुवारी रामलल्लाची मूर्ती आसनावर विधिवत पद्धतीने ठेवण्यात आली. त्यानंतर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी सुरू असलेल्या विधींपैकी एक असलेला गणेशपूजन, वरुणपूजा, जलाधिवास विधी पार पडला.

ही पूजा वाराणसीचे आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड आणि त्यांचे सहकारी लक्ष्मीकांत वाजपेयी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. यावेळी यजमान दाम्पत्य डॉ. अनिल मिश्रा व त्यांच्या पत्नी, ट्रस्टचे सचिव चंपत राय, कोषाध्यक्ष आचार्य गोविंदगिरी आदी उपस्थित होते.



**आज कोणते विधी?**

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त शुक्रवारी औषधाधिवास, केसराधिवास, घृताधिवास आणि धान्याधिवास विधी पार पडणार आहेत. त्यानंतर शनिवारी शर्कराधिवास, फलाधिवास आणि पुष्पाधिवास हे विधी होणार आहेत.

**केंद्रीय कार्यालये, बँकांना अर्धा दिवस सुट्टी**

अयोध्येतील राम मंदिरातील अभिषेक सोहळ्यामुळे २२ जानेवारी रोजी देशभरातील सर्व केंद्र सरकारी कार्यालये अर्धा दिवस बंद राहणार आहेत, असे कार्मिक मंत्रालयाने गुरुवारी जाहीर केले. सार्वजनिक बँका, ग्रामीण बँका आणि विमा कंपन्या, वित्तीय संस्था व केंद्र सरकारी कार्यालयांना या दिवशी अर्धा दिवस सुट्टी जाहीर झाली आहे.

**चार तास चालला आगमन सोहळा**

पुजारी अरुण दीक्षित यांनी सांगितले की, रामलल्लाची मूर्ती गर्भगृहात दाखल झाली आहे. ती प्रतिष्ठापित (विराजमान) झालेली नाही. मूर्ती गर्भगृहात आसनावर ठेवण्यात आली. या प्रक्रियेला ४ तास लागले. गुरुवारी 'गणेश पूजा' आणि 'वरुण पूजा' करण्यात आली.

रामलल्लाची मूर्ती पाण्यात ठेवली गेली ज्याला 'जलाधिवास' म्हणतात. १२१ पुरोहितांना त्यांची पूजा कर्तव्ये सोपवली गेली आणि मंदिराच्या आवारात गर्भगृहाबाहेर वास्तूपूजा करण्यात आली. पूजन सोहळ्यावेळी सामूहिक रामायण पठण करण्यात आले.

**अयोध्येत रस्त्यांवर धनुष्यबाणांच्या कलाकृती**

अयोध्येत नव्याने बांधण्यात आलेल्या राम मंदिराच्या अभिषेक सोहळ्याच्या आधी, शहर पूर्णपणे सजले आहे. भगवान राम आणि त्यांचे धनुष्यबाण दर्शविलेल्या कलाकृतींनी शहर सजले आहे.उड्डाणपुलावर पथदिवे बसवण्यात आले आहेत. पारंपरिक 'रामानंदी टिळक' थीमवर आधारित डिझाइन्स असलेले दीपस्तंभ लक्ष वेधून घेत आहेत.

## राम मंदिराचा निकाल देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायधीशांनाही प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं निमंत्रण



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत रामलल्लाच्या अभिषेकासाठी अवघे काही दिवस उरले आहेत. २२ जानेवारीच्या दिवशी हा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी देश-विदेशातल्या व्यक्तींना निमंत्रणं पाठवण्यात आली आहेत. या सोहळ्याला काँग्रेसने येणार नसल्याचं म्हटलं आहे. तसंच शरद पवार यांनीही आपण या सोहळ्याला जाणार नसल्याचं म्हटलं आहे. तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाचे जे पाच न्यायाधीश होते त्या सगळ्यांनाही या सोहळ्यासाठी निमंत्रण धाडण्यात आलं आहे.

राम मंदिर आणि बाबरी मशीद वादाची सुनावणी करणारे पाच न्यायमूर्ती रंजन गोगोई, शरद बोबडे, डीवाय चंद्रचूड, अशोक भूषण आणि एस. अब्दुल नजीर अशा पाचही न्यायाधीशांना निमंत्रण पाठवण्यात आलं आहे. या पाचजणांनी रामजन्मभूमीच्या बाजूने निकाल दिला होता. ज्यानंतर मंदिर निर्मिताचा मार्ग मोकळा झाला. आता हे पाचही न्यायाधीश प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला येणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

## कामगारांनो, नव्या घरात रामज्योती प्रज्वलित करा! पंतप्रधान मोदी यांचे आवाहन

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक सोलापूर**

रामलला आपल्या भव्य मंदिरात विराजमान होत असताना सोलापुरात एक लाख लोकांचा नवीन गृहप्रवेश होत आहे. २२ जानेवारीला आपण नवीन घरात गेल्यानंतर रामज्योती प्रज्वलित कराव्यात, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी कुंभारी येथील रे नगरात १५ हजार कामगारांना घरांचे वाटप झाले. यावेळी ते बोलत होते. मंचावर राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार होते. मोदी यांनी भाषणाची सुरूवात मराठीत केली.

पंढरपूरचा श्री विठ्ठल अन् सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वर महाराजांना नमस्कार केला. २२ जानेवारीला रामललांची प्राणप्रतिष्ठा होणार असे म्हणताच उपस्थित जनसमुदायाने 'जय श्रीराम जय श्रीराम' अशा घोषणा दिल्या. मोदी म्हणाले, आपण २२ जानेवारीला रामज्योती प्रज्वलित केल्या तर गरीबी नष्ट करण्याची प्रेरणा मिळेल.

देशात 'गरीबी हटाव' च्या अनेकदा केवळ घोषणा देण्यात आल्या; पण गरीबी कधीच हटली नाही. 'आर्धी भाकरी तरी



खायला मिळेल' असेही बोलले जायचे; पण का? आता मोदी आहे, तुम्हाला पूर्ण भाकरी मिळेल, असेही मोदी म्हणाले.

**सांगितलं सोलापूर अन् स्वत:चं नातं**

सोलापूर अन् स्वत:चं नातं सांगताना मोदी म्हणाले, सोलापूर ही श्रमिकांची नगरी आहे. माझं कार्यक्षेत्र अहमदाबाद आहे. तीही श्रमिकांची नगरी आहे. यंत्रमाग कामगार तेथेही आहेत. पद्मशाली कुटुंबं अहमदाबादमध्येही आहेत. मी अनेकदा त्यांच्याकडे जेवायचो. छोट्या घरात राहायचे; पण जेऊ घालायचे. कधी त्यांना स्वत:ला जेवण मिळाले नाही; पण मला रात्री उपाशी झोपू दिले नाही, असेही मोदी म्हणाले.

**...अन् पंतप्रधान मोदींच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले**

सर्व सामान्य कष्टकरी लोकांना घर किती महत्वाचे असते याची जाणीव आहे. आज जे घर तुम्हाला मिळत आहे, ते पाहून मला असे वाटते की कदाचित मीही लहानपणी अशा घरात राहिलो असतो तर, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी भावूक झाले. अचानक त्यांचा आवाज कातर झाला आणि त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

**उपस्थित लोकही भावूक झाले**


मोदी म्हणाले, २२ जानेवारी रोजी आयोध्येमध्ये प्रभू श्री रामांच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना होत आहे. त्या दिवशी गरिबांचा अंधकार दूर होईल. तुमचे जिवन आनंदाने भरू जावो अशी सदिच्छाही त्यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या भाषणाने उपस्थित लोकही भावूक झाले होतो.

## ...तर इंडिया आघाडीचे काही खरे नाही, अद्यापही वेळ गेली नाही; फारूक अब्दुल्ला थेट बोलले

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी एकत्रित येऊन इंडिया आघाडी स्थापन केली असली तरी निवडणुका होईपर्यंत ती टिकेल का, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. जागावाटपावरून इंडिया आघाडीतील मतभेद चव्हाट्यावर येत आहेत. जम्मू काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूक अब्दुल्ला यांनी इंडिया आघाडीबाबत स्पष्ट मत व्यक्त केले आहे. अद्यापही वेळ गेलेली नाही. मात्र, जागावाटपावर एकमत झाले नाही, तर इंडिया आघाडीचे काही खरे नाही, असे फारूक अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

लोकसभा निवडणुकांसाठी आता कमी कालावधी आहे. जागावाटप लवकर झाले नाही तर इंडिया आघाडीसाठी तो धोका ठरू शकेल. जागावाटपाची प्रक्रिया किंवा निर्णय त्वरीत आणि योग्य वेळेत केले पाहिजे. इंडिया आघाडीत समावेश असलेल्या पक्षांमध्ये



याबाबत लवकरच एकमत झाले नाही, तर काही पक्ष वेगळा गट स्थापन करण्याचा प्रयत्न करू शकतात आणि असे झाले तर इंडिया आघाडीसाठी तो सर्वांत मोठा धोका ठरू शकतो. अद्यापही वेळ गेलेली नाही, असे सूतोवाच फारूक अब्दुल्ला यांनी केले.

**जागावाटपावरून मतभेद कायम, अजूनही एकमत नाही**

लोकसभा निवडणुकीसाठी विरोधक एकत्रित लढण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, इंडिया आघाडीतील पक्षांमध्ये जागावाटपाचे घोडे अडले आहे. पश्चिम बंगाल, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार आणि केरळसह अनेक राज्यांमध्ये पक्षांमध्ये एकमत झालेले नाही. जागावाटपाबाबत काँग्रेसने एक समिती स्थापन केली असून, त्यात मुकुल वासनिक, अशोक गेहलोत, भूपेश बघेल, सलमान खुर्शीद आणि मोहन प्रकाश यांचा समावेश करण्यात आला आहे. या नेत्यांना विविध पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करून जागावाटपाची रूपरेषा ठरवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, अद्याप कोणत्याही राज्यात जागावाटपाबाबत निर्णय झालेला नाही.दरम्यान, इंडिया आघाडीसाठी सर्वांत कठीण परिस्थिती पश्चिम बंगालमध्ये असल्याची चर्चा आहे. तृणमूल काँग्रेसने लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसला फक्त दोन जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. काँग्रेसने हा प्रस्ताव फेटाळला असून, अधीर रंजन चौधरी यांनी या प्रस्तावावरून ममता बॅनर्जी यांच्यावर तोफ डागली आहे. याशिवाय इंडिया आघाडीतील सीपीआय आणि सीपीआयएमलाही काही जागा सोडाव्या लागणार आहे. पण, यावर अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही.

## २१ तारखेपर्यंत आत्मसमर्पण करा; बिल्किस बानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाचे आरोपींना स्पष्ट आदेश

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

गुजरातमधील २००२ च्या दंगलीत बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार आणि तिच्या कुटुंबातील सात सदस्यांची हत्या केल्याप्रकरणी ११ दोषींना माफी देण्याचा गुजरातसरकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. तसेच दोषींना दोन आठवड्यांच्या आत तुरुंग अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण करण्याचे निर्देश दिले. मात्र, आत्मसमर्पण करण्यासाठी मुदत द्यावी, अशी याचिका आरोपींनी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली.

गुजरात सरकारने हा आदेश एकसुरी आणि विवेकबुद्धीचा वापर न करता जारी केला होता, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला फटकारले. यानंतर यातील काही आरोपींनी आत्मसमर्पण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी विनंती करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाला केली. या याचिकेवर सुनावणी घेण्यात आली. तेव्हा २१ जानेवारीपर्यंत आत्मसमर्पण करा, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.



न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने सांगितले की, आम्ही म्हणणे ऐकून घेतले आहे. परंतु, आरोपींनी आत्मसमर्पण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी, यासाठी जी कारणे सादर केली आहेत, त्यात काहीच तथ्य नाही. त्यामुळे ही याचिका फेटाळली जात आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणातील आरोपी गोविंदभाई नाईक, रमेश रूपाभाई चंदना आणि मितेश चिमणलाल भट यांनी वेगवेगळ्या कारणांमुळे मुदत वाढवून देण्याची विनंती केली होती.

दरम्यान, आजारपणाचे कारण देत गोविंदभाई नाईक यांनी आत्मसमर्पणाची मुदत ४ आठवड्यांनी वाढवण्याची मागणी केली. रमेश रुपाभाई चंदना यांनी मुलाच्या लग्नाचे कारण देत, तर मितेश चिमणलाल भट यांनी सुगीचा हंगाम असल्याचे कारण देत आत्मसमर्पण करण्यासाठी ६ आठवड्यांची मुदत देण्याची मागणी केली. मात्र, या याचिका फेटाळण्यात आल्या.

## संक्रांतीनंतर सोन्याच्या दरात मोठी घसरण

**दि. १९ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:**

संक्रांतीच्या दिवशी नागपूरात २४ कॅरेट सोन्याचे दर ६३ हजार रुपये प्रति दहा ग्रामपर्यंत वाढले होते. परंतु सोन्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने १९ जानेवारी २०२४ च्या सकाळी ११.३० वाजता हे दर ६२ हजार ५०० रुपये प्रति दहा ग्राम नोंदवण्यात आले आहे. त्यामुळे सोन्याचे दागिने खरेदीसाठी इच्छुक असलेल्यांना दिलासा मिळाला आहे.

सोन्याच्या दरात सतत चढ- उताराचा क्रम कायम आहे. संक्रांतीमध्ये सोन्याचे दर वाढल्याने लग्न समारंभासह सोने- चांदीचे दागिने खरेदीसाठी उत्सूक कुटुंबात नाराजी दिसत होती. परंतु पून्हा दर कमी झाल्याने या कुटुंबाला दिलासा मिळाला आहे. आपल्याकडे सोने, चांदी, हिरे, प्लाटिनम धातूपासून तयार दागिने लग्न समारंभासह विविध सनात मोठ्या प्रमाणात नागरिकांकडून खरेदी केली जाते. तर आवडीनुसारही या खातूच्या खरेदीकडे नागरिकांचा कल वाढतांनाच दिसत आहे.

## आमदार प्रविण पोटे पाटील यांनी केले शहरातील विविध मंदिरांमध्ये श्रमदान

### भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मंदिर स्वच्छता अभियानात मग्न

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

प्रदीर्घ कालखंडा नंतर प्रभु श्रीराम चंद्र जन्मभूमी अयोध्या येथे श्रीरामलला ची प्राणप्रतिष्ठा होणार आहे संपूर्ण देश राममय झाले असून आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या आवाहनानुसार २२ जानेवारी २०२४ पर्यंत संपूर्ण भारतभर मंदिर स्वच्छ करून सर्व परिसराची साफसफाई करण्यात येत आहे या स्वच्छतीर्थ अभियान अंतर्गत भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांनी अमरावती शहरातील विविध मंदिरामध्ये जाऊन स्वच्छतीर्थ अभियान राबवित आहे याची सुरवात नुकताच त्यांनी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासोबत अंबादेवी मंदिरापासून केली याच पार्शवभूमीवर दररोज अमरावती येथील विविध मंदिरामध्ये भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या



नेतृत्वाखाली भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते स्वच्छतीर्थ अभियान राबवित आहे . स्वछतीर्थ अभियानात आमदार प्रविण पोटे पाटील यांनी श्रीराम मंदिर अंबिका नगर, शिव मंदिर कंवर नगर, श्री संत गजानन महाराज मंदिर बापू कॉलोनी, हनुमान मंदिर राजापेठ, जय समाधा मंदिर दरोगा प्लॉट येथे संपूर्ण मंदिर परिसराची साफ सफाई तसेच मंदिर स्वच्छ करत श्रमदान केले.

प्रभू श्री राम यांच्या प्राण प्रतिष्ठा सोहळ्याच्या पर्वावर देशातील सर्वजण आपला खारीचा वाटा भजन, कीर्तन , रामनाम, दीपोत्सव तसेच श्रमदानातून योगदान देउन राबवित आहे. २२ जानेवारी ला प्राणपतिष्ठा सोहळा दरम्यान आपापल्या घरी दीप प्रज्वलन , रामरक्षा स्तोत्र पठण, भजन , कीर्तन, महाआरती मध्ये सहभाग घेऊन अभूतपूर्व सौदर्य सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे आवाहन आमदार प्रविण पोटे पाटील यांनी अमरावतीकरांना केले आहे यावेळी सतीश करेसीया, लखन राज, श्रीकांत धानोकर यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते या अभियानात उपस्थित होते.

## संपादकीय ......

# कायद्याचा महाखेळ

गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी विविध कायदे केले जातात. हे कायदे अस्तित्वात येत असताना 'कडक' असतात, पण ते लागू होत असतानाच सर्वात पहिल्यांदा त्यातील पळवाटा शोधल्या जातात. या पळवाटा शोधून अलगदपणे पळ काढणारा कुणाच्या हाती येत नाही आणि कायद्याच्या कसोटीवर ते सिद्धही करता येत नाही हे वास्तव कोणीच नाकारू शकत नाही. गेल्या आठवड्यात विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी दिलेला निकाल वेगळे काय सांगतो? बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित आमदार अपात्रतेचा निकाल १० जानेवारीला जाहीर झाला. निकालही अपेक्षितच होता आणि त्यावर अपेक्षितच प्रतिक्रिया उमटल्या. अयोध्येतील राम मंदिरावरून सुरू असलेल्या राजकारणापासून चर्चेला वेगळा मुद्दा मिळाला एवढेच.

शिवसेनेमध्ये जून २०२२मध्ये झालेल्या बंडानंतर ठाकरे तसेच शिंदे गटाने परस्परविरोधात आमदार अपात्रतेच्या याचिका दाखल केल्या होत्या. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील ५ सदस्यीय घटनापीठाने ११ मे २०२३ रोजी या सत्तासंघर्षाचा निकाल देताना आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा विधानसभा अध्यक्षांकडे वर्ग केला. त्यानुसार तब्बल ८ महिने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यावर सुनावणी घेतली. त्यानंतर दोन्ही गटांच्या याचिका फेटाळल्या. हा निर्णय देताना २०१३ तसेच २०१८ साली झालेली शिवसेनेची राष्ट्रीय कार्यकारिणी, प्रतिनिधी सभा आणि पंचवार्षिक निवडणूक तसेच प्रामुख्याने यावेळी करण्यात आलेली घटना दुरुस्ती अमान्य करीत राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या १९९९च्या पक्षघटनेला आधार मानले. त्याच अनुषंगाने विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने याबाबत तीव्र प्रतिक्रिया देताना सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे ठरविले. त्यामुळे ही लढाई उच्चतम न्यायमंदिरात लढली जाईल हे निश्चित होते, पण पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी न्यायमंदिराबरोबरच हा वाद न्यायासाठी थेट लोकांसमोर नेला. मंगळवारी त्यांनी महापत्रकार परिषद घेतली आणि राहुल नार्वेकर यांचा निकाल कसा चुकीचा होता हे सांगितले. यासाठी त्यांनी मोठ्या स्क्रीनवर संबंधित कागदपत्रे तसेच २०१३ आणि २०१८मधील कार्यकारिणीच्या बैठकीची ध्वनिचित्रफित दाखवली. यावरून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निर्णय देताना पक्षपातीपणा केल्याकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बोट दाखविले. त्यानंतर त्यांनी काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले. हे प्रश्न सर्वसामान्यांच्या मनातही आहेत.

# आई, तुझी आठवण येते !

जीवनातल्या प्रत्येक क्षणाला आई हवी होती, असे प्रकर्षाने वाटते. पण राष्ट्रजीवनातील या सोनेरी क्षणाला मला तिची जास्त आठवण येते. सामान्य स्थितीत, सामान्य कुटुंबात जन्माला आलेली ही पिढी केवढा ध्येयवाद उराशी बाळगून जगली ! मला पूर्ण कल्पना आहे की मला या क्षणाला माझी आई स्मरते हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. या देशातील लक्षावधी कुटुंबांनी प्रवाहाच्या विरोधात प्रवास केला. टिंगल, टवाळी, चेष्टा सहन केली. प्रचंड संघर्ष केला. राजकारणात असलेल्यांची नावं स्मरणात तरी राहिली. मात्र, असंख्य कुटुंबांनी ख्यातिप्राप्तीसाठी हा संघर्ष केला नाही.डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली तेव्हा ते देखील टिंगल टवाळीचाच विषय ठरले होते. डॉक्टरांच्या विचार व कार्य प्रवाहात पोहणे हे तेव्हा प्रतिकुलच होते. पण वरकरणी सामान्य वाटणाऱ्या असंख्य कुटुंबांनी तेव्हा असामान्य काम केले. खऱ्या अर्थाने कर्तृत्व सिद्ध केले. सरसंघचालकांचा शब्द आणि संघाचा निर्णय प्रमाण मानून ते ध्येय गाठण्यासाठी लक्षावधी कुटुंब तयार झाले.



**आम्हास नको मुळी मान मरातब काही-किर्तीची आम्हा हाव मुळीही नाही** या मानसिकतेने आयुष्यभर कार्यरत असलेल्या व स्वतःला 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील' मानणाऱ्या पिढीची प्रतिनिधी म्हणून आईची आठवण आवर्जून येते. अफाट लोकप्रियतेवर असलेल्या काँग्रेसच्या विशाल पदयात्रा निघत असताना जनसंघाच्या टीमटीमणाऱ्या दिव्याला हाती घेऊन छोट्याशा चमुला शक्ती मानणारे हे लोक.जरि देईल टकरा नाग बलाने देवो करु अमर पाजुनी रस पाताळातील । या संकल्पाने तेव्हाच्या महाशक्तीशी टक्कर द्यायला घाबरत नव्हते.'मंदिर उभविणे हेच आमुचे शील' हे या तमाम संघ स्वयंसेवकांच्या कुटुंबियांचे ध्येय होते. एकदा नव्हे तर तीनदा संघावर बंदी आली. पण स्वयंसेवक बिथरले नाहीत. शारीरिक, मानसिक अत्याचार झाले. कारागृहात राहावे लागले. मात्र, कोणीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. संघात महिला येत नाहीत म्हणून विरोधक संघाला डिवचतात. पण त्यांना हे माहीत नाही की संघात जाणाऱ्या पुरुषांच्या एवढा किंवा थोडा अधिक संघ त्यांच्या घरातील माय माऊलींना कळला. संघ वाढवण्यात त्यांचा हातभार जास्त आहे. संघात न गेलेल्यांना हे कळणार नाही.पाहता पाहता संघाचा भारतमातेला परम वैभवाला नेण्याचा विचार या देशाने स्वीकारला. आज देश गर्वाने श्रीरामजन्मभूमी मंदिराकडे राष्ट्रमंदिर म्हणून पाहतो आहे.त्या पिढीतील बहुसंख्य लोकांना काश्मिरातील ३७० कलम हटलेले पाहता आले नाही. आता रामलला विराजमान होणार ! केवढा हा आनंदाचा प्रसंग ! याच साठी तर केला होता अट्टाहास !१९९०च्या कारसेवेच्या वेळी मी अयोध्येला गेलो तर माझ्या कणखर आईला कधीही असे वाटले नाही की तू जाऊ नये. उत्तर प्रदेशातून रामभक्तांना कसे अडवले जात आहे, त्यांना गुन्हेगारासारखी वागणूक मिळते आहे, अशा बातम्या सतत येत होत्या. कारसेवेला जाणे म्हणजे संघर्षच करावा लागणार, याची कल्पना असताना तिने मला पाठवले. यातील मी आणि माझी आई म्हणजे केवळ प्रातिनिधिक उदाहरण. *अयोध्येत कारसेवेसाठी पोहचलेल्या लक्षावधी कारसेवकांकडे अशीच स्थिती असणार नं !*पंधरा - वीस दिवस आधी घरून निघालेले नंतर पुढचे आणखी वीस दिवस घरी न पोहचलेल्या रामभक्तांच्या आईच्या मनःस्थितीला प्रणामच करायला हवा ! तार नाही, पत्र नाही, कोणाच्या घरी फोन नाही, संपर्काची साधने नाहीत.

**शिवराय कुळकर्णी**
**प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र**
**९८८१७१७८२७**



पण माय माऊल्या डगमगल्या नाहीत. संघ विचाराने या सामान्य वाटणाऱ्या असंख्य मातांचे मन घडवले. श्रीरामजन्मभूमी अभियानात घराघरातील तरुणांना याच मातांनी भक्कम पाठबळ दिले. गावातून कारसेवेला गेलेले आमचे पोरं सुखरूप येऊ दे एवढी प्रार्थना फक्त त्या रामरायाला करीत असणार !*स्वातंत्र्यपूर्व काळात अशी असंख्य उदाहरणे पाहायला मिळाली. आपला तरुण एकुलता एक मुलगा स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आहुती दिल्यावर त्याच्या शहिदत्वावर अश्रू ढाळण्याऐवजी केवळ एकच मुलगा जन्माला घालू शकली म्हणून स्वतःचा कुशीला दोष देणाऱ्या त्या माता होत्या. एकाहून अधिक मुलं असते तर ते देखील स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आहुती दिले असते, ही त्यांची भावना होती. रामकुमार कोठारी आणि शरदकुमार कोठारी या दोन्ही युवकांनी श्रीरामजन्मभूमी आंदोलनात बलिदान दिले त्या वीरांची माता याच पंक्तीत बसणारी आहे.संघ विचारसारणीतून तयार झालेल्या विविध संस्थांनी किंवा नेतृत्वाने देशहितासाठी पुकारलेल्या आंदोलनांमध्ये माघार न घेता लढण्याचा मंत्र मातृशक्तीनेच तर दिला ! प्रत्येक घरात त्या खंबीरपणे उभ्या होत्या म्हणून लढणाऱ्याचे अवसान कायम होते. आणिबाणीतील कारागृहातील सतरा - अठरा महिन्यांचा बंदीवास असो, काश्मीर लढ्यातील संघर्ष असो की श्रीरामजन्मभूमी मुक्ती संग्राम असो, माघार घ्यायची नाही ही मानसिकता मायमाऊलींची होती. आज यापैकी असंख्य माता नाहीत. २२ जानेवारीला त्या केवढ्या आनंदात राहिल्या असत्या ! ज्या देशात उपहास झाला तिथेच रामरायाची पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, सरसंघचालक डॉ. मोहनराव भागवत यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा होणार आहे. या ऐतिहासिक क्षणाला मला माझ्या आईची आठवण होते आहे. अनेक घरांमध्ये त्या पिढीच्या हयात नसलेल्यांचे स्मरण होतच असणार !( ३० ऑक्टोबर १९९० रोजी कारसेवेतून परतल्यावर आईने औक्षण केले. आजही ३४ वर्षांनी तो कृतार्थ स्पर्श स्मरतो )-

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा नियोजन सभा

## ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान होणार स्पर्धा





**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** जिल्ह्यातील शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा दिनांक ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२४ दरम्यान जिल्हा स्टेडियम येथे होणार आहे. या क्रीडा स्पर्धेची नियोजन सभा नुकतीच जिल्हा परिषद मुलींची शाळा (गर्ल्स हायस्कूल) अमरावती येथे घेण्यात आली. गटशिक्षणाधिकारी तथा प्राचार्य धनंजय वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.यावेळी गट शिक्षणाधिकारी दीपक कोकतरे, प्रमिला शेंडे,प्राचार्य गंगाधर मोहने विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर, अश्विन मानकर, शरद कान्हेरकर,शकील अहमद आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.यावेळी क्रीडा स्पर्धा उत्कृष्टरित्या पार पाडाव्यात यासाठी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने समितीचे गठण करण्यात आले. यावेळी शिक्षक संघटना राजेश सावरकर, व्ही सी. रेखाते, राजकुमार खर्चान , शहजाद अहमद, मिलिंद कोकाटे, राजेंद्र दीक्षित, किशोर मालोकर, रा.ना.गावंडे, सुनील कुकडे, सुधीर कवाणे, संदीप देशमुख, गजानन खोपे, मनोज चोरपगार , किशोर रुपनारायण, संजय वाटाणे, प्रशांत पवार, सुरेश चीमणकर, सोमेश्वर खानंदे, मनोज खोडके आदींची उपस्थिती होती.यावेळेस काही खेळांचा नव्याने समाविष्ट करण्यात करण्यात आला असून काही खेळ वगळण्यात आली आहेत.

### नव्याने समाविष्ट खेळ

कबड्डी मुली(माध्यमिक) रीले स्पर्धा, गोलाफेक, टेनिक्कईड (मुली) नव्याने समावेश करण्यात आला.

**वगळलेले खेळ-** तीन पायांची शर्यत, पोत्याची शर्यत, बटाटा शर्यत, चाटी रेस आदी खेळ वगळण्यात आले आहे.

# आरोग्य संपदा आहार





## वाढत्या वयाबरोबर गोष्टी विसरायला होतायत? 'या' सोप्या टिप्स फॉलो करा; स्मरणशक्तीही वाढेल

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक -** जसजसं आपलं वय वाढत जातं त्याचा परिणाम आपल्या त्वचेवर देखील दिसू लागतो. त्याप्रमाणे वाढत्या वयाचा आपल्या मेंदूवरही हा परिणाम होतो. कालांतराने पूर्वीसारख्या गोष्टी लक्षात राहत नाहीत. अशा वेळी कधी कधी आपल्याला स्वत:चाच राग येऊ लागतो. चिडचिड होते. कोणत्याच कामात मन रमत नाही. अशा वेळी आम्ही तुमच्यासाठी अशाच काही सोप्या टिप्स सांगणार आहोत, ज्याचा वापर केल्याने तुमच्या स्मरणशक्तीवर कोणताच परिणाम होणार नाही. तसेच, तुमच्या गोष्टीही लक्षात राहतील आणि मूडही चांगला राहील.

**व्यायाम करा -** सकाळी लवकर व्यायाम करणे आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते. व्यायामासाठी तुमच्या वयाचा कोणताच फरक पडत नाही. याऊलट जसजसं वय वाढत जातं तसतसं मेडिटेशन, योगा करणं गरजेचं आहे. यामुळे तुमची शारीरिक तंदुरुस्ती तसेच तुमचे मानसिक आरोग्य सुधारेल.

**मन सक्रिय ठेवा-** तुम्ही तुमच्या दिनचर्येत वाचन आणि लेखनाची सवय लावू शकता. वर्तमानपत्रांबरोबरच तुमच्या आवडीनुसार नवीन पुस्तके, लेख वाचत राहा. तसेच, तुम्ही हार्मोनियम, तबला, बासरी आणि पियानो यांसारखी वादने देखील वाजवू शकता. नवीन गोष्टी शिकू शकता.

**खेळ खेळा-** तुम्हाला जर तणाव जाणवत असेल तर तुम्ही एखादा खेळ देखील खेळू शकता. या सवयीमुळे तुमचं मन तीक्ष्ण राहण्यास मदत होऊ शकते. तुम्ही पजल, क्रॉस अॅन्ड क्विझ, चेस यांसारखे गेम खेळू शकता. हे तुमच्या मनाला योग्य ते विचार करण्यास मदत करतील.



**गोष्टी लिहून लक्षात ठेवा -**असं म्हणतात ज्या गोष्टी आपण लिहितो त्या जास्त लक्षात राहतात. अशा वेळी तुम्ही मोबाईल नंबर, घरचा पत्ता, नाव किंवा काही ठिकाणं डायरीत लिहून लक्षात ठेवा. तुम्ही डायरी लिहिण्याची सवय देखील लावू शकता. ही सवय तुमच्या मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

**तणाव मॅनेज करा-** तणावाचा आपल्या एकूण आरोग्यावर वाईट परिणाम होतो. अशा परिस्थितीत, तुमचे वय कितीही असो, तणावापासून दूर राहण्यासाठी तुम्ही माइंडफुलनेसचा नियम फॉलो करा. यामध्ये तुम्ही ध्यान, दीर्घ श्वास, योग आणि निसर्गात मन रमवू शकता.

# अयोध्येत रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात वाजवणार सुंद्री

## मंजूळ अन पवित्र स्वरांचं अनोखं वाद्य

### सुवर्ण महोत्सव अंतर्गत भारतातील विविध राज्यातील २५ टापर्स कलाकारांना आले बोलवण्यात

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक सोलापूर:** सोलापूरचे प्रसिद्ध सुंद्री वादक पंडित भीमण्णा जाधव यांना अयोध्येत रामलल्ला प्राण प्रतिष्ठापना सोहळ्यात सुंदरीचे मंजूळ अन पवित्र स्वर प्रकट करण्यासाठी खास निमंत्रण मिळाले आहे. भगवान श्रीरामाच्या जन्मस्थानी भव्य मंदिर उभारल्यामुळे देशात एक वेगळीच उत्साहाचं वातावरण आहे राम मंदिरात अभिषेक होण्यासाठी आता अवघे काही दिवस उरले असून संपूर्ण देश या भव्य सोहळ्याचा साक्षीदार होणार आहे. भारताचे दुर्मिळ सुषीर वाद्याचे प्रचार प्रसारक म्हणून पंडित भिमण्णा जाधव यांना सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार व केंद्रीय संगीत नाटक अकादेमी यांच्याकडून सुंद्री वाद्यवादना करिता खास राम मंदिर प्रतिष्ठापणेचं निमंत्रण पाठवण्यात आलं आहे.सुवर्ण



महोत्सव अंतर्गत भारतातील विविध राज्यातील २५ टापर्स कलाकारांना बोलवण्यात आले आहे. त्यामध्ये पंडीत जाधव यांचा समावेश आहे. यापूर्वी सांस्कृतिक मंत्रालयाच्या माध्यमातून जाधव यांना सप्टेंबर २०२३ मध्ये ऋ२० शिखर संमेलन व तसेच यशोभूमी कार्यक्रमांतर्गत करिता खास निमंत्रण देण्यात आलेलं होतं. पंडित जाधव हे सुंद्रीसम्राट सिद्राम जाधव यांचे नातू आहेत. तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू, श्रीमती इदिरा गांधी यांनी सुंद्रीवाद्याची प्रशसा केली होती. पंडीत भिमण्णा जाधव यांनी वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी युवावाणी ऑल इंडिया रेडिओसाठी प्रसारक म्हणून सार्वजनिक पदार्पण केले. सोलापूर सुंदरी हे दुर्मिळ आणि अद्वितीय वाद्य आहे. पंडित भीमण्णा यांनी या वाद्याचा भारताच्या सीमेपलीकडे गौरव केला आहे, त्यांनी फ्रान्स आणि बेल्जियममध्ये आपली कला सादर करून आपल्या कुटुंबाची स्वप्ने साकार केली आहेत.

# दूध उत्पादक शेतकऱ्यांकरिता अनुदान योजना

## योजनेचा लाभासाठी २० जानेवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** राज्यातील सहकारी संघ व खाजगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी राज्यातील सहकारी दूध संघ, खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्युसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) आदींनी आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांच्याकडे दि. २० जानेवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास विभागाव्दारे करण्यात आले आहे.

शासनाने जाहिर केलेल्या दूधास प्रतिलीटर पाच रुपये अनुदान योजनेत सहभागी होण्यासाठी सहकारी संघ, खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्यसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) आदींनी विहीत नमुन्यातील अर्ज आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे दि. २० जानेवारी २०२४ पर्यंत सादर करणे बंधनकारक असून तीच तारीख अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत आहे.

अनुदान योजनेत सहभागी होणाऱ्या सहकारी दूध संघ व खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्यसर कंपनी (दूग्धव्यवसायाशी संबंधित) यांनी डी.बी.टी. करण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते त्यांचा आधारकार्डशी व पशुधनाच्या कानातील बिल्लयाशी संलग्न (लिंक) करणे आवश्यक आहे. या योजनेत दूध उत्पादक शेतकरी दूध संघास किंवा खाजगी प्रकल्पास दूध पुरवठा करतात ते शेतकरी, सहकारी संघ किंवा खाजगी प्रकल्पांमार्फत तसेच दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्युसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) योजनेत सहभागी होवू शकतात.

योजनेचा कालावधी दि. ११ जानेवारी ते दि. १० फेब्रुवारी २०२४ पर्यंत राबविण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. या याजनेत सहभागी होणाऱ्या सहकारी संघ/ खाजगी प्रकल्पांमार्फत तसेच दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्युसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) आपले स्वतंत्र अर्ज माहितीस्तव ddcmaharashtragmail.com या ई-मेल आयडीवर सादर करावेत, असे आवाहन प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे-

# पक्ष सोडणारे चोर किंवा डरपोक

## यशोमती ठाकूर यांचा अमरावतीत घणाघात




**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – काही लोक काँग्रेस पक्षातील वैभवशाली परंपरा सोडून आता दुसऱ्या पक्षाचा मार्ग अवलंबत आहेत. मात्र हे लोक एकतर डरपोक आहे किंवा चोर अशा तिखट शब्दात माजी मंत्री आणि काँग्रेस नेत्या आमदार यशोमती ठाकूर यांनी घनाघात केला. अमरावती येथे भरलेल्या काँग्रेसच्या विभागीय आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी बोलताना ठाकूर पुढे म्हणाल्या की, काँग्रेस पक्षाचे नेते आदरणीय राहुल गांधी यांनी सांगितल्याप्रमाणे न्याय मिळेपर्यंत आपल्याला प्रत्येक घराघरात गेलं पाहिजे. प्रत्येक घराघरात सर्वधर्मसमभावाचा दिवा लावला पाहिजे आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात तिरंगा फडकवला पाहिजे. आज काही लोक हे केवळ विष पेरण्याचं काम करीत आहेत मात्र समाजात त्यांनी पेरलेलं विष कमी करण्याचे काम आपलं आहे. त्यांना जितकं विष पेरायचा आहे पेरू द्या मात्र आपल्याला घराघरात प्रेमच द्यायचा आहे. त्यासाठी काँग्रेस पक्षाने आम्हाला असा कार्यक्रम द्यावा ज्यामुळे प्रत्येक नागरिकाच्या मनात देशाप्रती सर्वधर्मसमभावाची आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण व्हायला पाहिजे. असे ठाकूर म्हणाल्या.पक्षातील एक माजी केंद्रीय राज्यमंत्री नुकतेच पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात गेले आहेत मात्र व्यक्ती तेव्हाच पक्ष सोडून जाते जेव्हा एक तर ती खूप डरपोक असते किंवा तिच्या मनात चोर असतो. अन्यथा सर्वधर्मसमभाव मांडणाऱ्या पक्षातून कोणीही जाणार नाही. आम्ही सर्व कार्यकर्ते ही ग्वाही देतो की, आम्ही कधीही पक्ष सोडून जाणार नाही, असे त्यांनी यावेळी ठामपणे निक्षून सांगितले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपण जर वातावरण पाहत असाल तर अमरावतीमध्ये पक्षासाठी अतिशय चांगले वातावरण आपल्याला या ठिकाणी दिसत आहे. हेच वातावरण यवतमाळ बुलढाणा आणि वाशिम या ठिकाणी सुद्धा आहे. जर आपण सर्व एकसंघपणे एकत्र आलो आणि एक दिलाने काम केलं तर निश्चितच अकोल्यामध्ये सुद्धा हेच वातावरण दिसायला हरकत नाही, असा ठाम विश्वास यावेळी यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला.

# प्रकाश आंबेडकरांना सोबत यायचयं तर खरगेंना भेटा, अडचण काय?- काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** २०१९ मध्ये वंचित बहुजन आघाडीमुळे ९ ठिकाणी काँग्रेसचे खासदार पडले आणि भाजपाचे निवडून आले हे वास्तव आहे. त्यामुळे असं काही प्रकाश आंबेडकरांनी करू नये. तुम्ही खरगेंना फोन केला तर तुम्हाला भेटायला कोण अडवणार आहे? तुम्ही कोणाच्या निमंत्रणाची वाट पाहताय? असा थेट सवाल काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकरांना विचारला आहे.

वंचितचा इंडिया आघाडीत समावेश करण्याबाबत पत्रकारांनी पृथ्वीराज चव्हाण यांना प्रश्न विचारला. त्यावेळी ते म्हणाले की, इंडिया आघाडी ही २८ पक्षांची आहे. त्या पक्षांनी मल्लिकार्जुन खरगेंना नेतृत्व दिले आहे. प्रकाश आंबेडकर इंडिया आघाडीतील नेत्यांना वैयक्तिक ओळखतात. जर त्यांना इंडिया आघाडीत यायचं असले तर त्यांनी खरगेंना भेटून सांगितले पाहिजे.एखादे पत्र दिले पाहिजे. पण ते कुणाच्या निमंत्रणाची वाट पाहतायेत माहिती नाही. त्यांना मोदींना हरवायचं आहे की नाही हा खरा प्रश्न आहे. माझ्या माहितीप्रमाणे प्रकाश आंबेडकरांनी पत्र लिहिले नाही. मी एक पत्र पाहिले जे त्यांच्या प्रवक्त्यांनी लिहिलं. स्वत: प्रकाश आंबेडकरांनी भेटायला काय हरकत आहे? ते नेते आहेत. २८ पक्षाचे नेते एकमेकांना भेटत आहेत. मग प्रकाश आंबेडकरांना भेटायला काय अडचण आहे? असं त्यांनी विचारले. तसेच प्रकाश आंबेडकर ठाकरेंच्या शिवसेनेसोबत चर्चा करतायेत त्यामुळे त्यांची चर्चा संपली की आम्हाला कळेल. प्रकाश आंबेडकर हे देशातील नेते आहेत. देशात त्यांच्या एकट्याकडे आंबेडकर हे नाव आहे. प्रकाश आंबेडकरांनी राष्ट्रीय राजकारणात सक्रीय झाले पाहिजे. त्यांनी देशाच्या संसदेत आले पाहिजे ही आमची प्रामाणिक इच्छा आहे. मी मुख्यमंत्री असतानाही असा प्रयत्न केला होता. पण जर अवास्तव मागणी झाली आणि जागा उभ्या केल्या तर त्याचा फायदा मोदींना होतो. मी वेळोवेळी सांगतोय असंही पृथ्वीराज चव्हाणांनी म्हटलं.



### ...म्हणून मविआच्या जागावाटपाला विलंब

तिन्ही पक्षांची चर्चा सुरू आहे. बाकी दोन्ही मित्रपक्षात फाटाफूट झालीय. त्यांची मते, २०१९ ची ताकद, नेते कोण आहेत याचे आकलन करायला आता वेळ लागतोय. त्यामुळे मागच्यावेळी भलेही शिवसेनेची जागा निवडून आली असेल परंतु त्यात शिंदे गट होता, भाजपा होता. आता हे दोन्ही नसताना त्यांची ताकद किती आहे याची चर्चा करावी लागेल म्हणून जागावाटपाला उशीर होत असल्याचं चव्हाणांनी सांगितले.

# गादीऐवजी चटईवर झोपणं, जेवणाऐवजी केवळ फलाहार...;

## प्राणप्रतिष्ठेसाठी नरेंद्र मोदींचा कठोर तप

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली** – येत्या २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडणार आहे. भारतातला हा ऐतिहासिक कार्यक्रम आहे. त्यासाठी सर्वत्र जय्यत तयारी करण्यात येत आहे. या सोहळ्यामुळे देशभरात रामभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारीच्या आधी ११ दिवस विशेष धार्मिक विधीची सुरुवात केली आहे. या ११ दिवसांत पंतप्रधान मोदी वेगवेगळ्या मंदिरात दर्शन घेताना दिसून येत आहेत. त्यात धावपळीच्या दिनक्रमातही पंतप्रधान मोदी या खास विधींच्या नियमांचे कठोर पालन करताना दिसत आहेत. माहितीनुसार, ११ दिवसांच्या या कालावधीत पंतप्रधान मोदी केवळ नारळ पाणी पित आहेत. त्याचसोबत जमिनीवर चटई टाकून झोपत आहेत. पंतप्रधान या काळात केवळ फलाहार आणि दूधापासून बनलेल्या गोष्टी खाऊ शकतात. त्यांना जमिनीवर झोपावे लागणार आहे असं राम



मंदिराचे पुजाऱ्यांनी एका हिंदी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले. १२ जानेवारीपासून पंतप्रधान मोदींनी या नियमाचे पालन करण्यास सुरुवात केली आहे. त्यात पहिल्या दिवशी मोदींनी नाशिकच्या काळाराम मंदिर येथे दर्शन घेतले आणि भजनात दंग झाले.

***जमिनीवर झोपण्याचे फायदे काय?***

आयुर्वेदानुसार, जमिनीवर झोपण्याचे अनेक फायदे आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे जमिनीवर झोपल्याने माणसाला श्वासोच्छवास सुलभ होतो. यामुळे स्मरणशक्ती सुधारण्यास मदत होते आणि उच्च रक्तदाबही नियंत्रणात राहतो. जमिनीवर झोपल्याने शरीरातील रक्ताभिसरणही सुधारते. शरीराची मुद्राही योग्य राहते. जे जमिनीवर झोपतात त्यांना पाठदुखीसारखी समस्या होत नाही.

# सुपरमध्ये डोके, मानेची जंक्शन शस्त्रक्रिया यशस्वी

## सहा तास चालली दुर्मीळ शस्त्रक्रिया, रुग्णाची प्रकृती स्थिर

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे डोके व मानेचे जंक्शन (सीव्हीजे) ची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. जिल्ह्यातील खार तळेगाव येथील ३९ वर्षीय रुग्ण हा पाच वर्षांपूर्वी पडल्याने त्याला चालण्यास त्रास होत होता. परंतु, सहा तासांच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर रुग्ण बरा झाल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे.ही शस्त्रक्रिया कठीण व गुंतागुंतीची असून, दुर्मीळ होती. जर वेळेत शस्त्रक्रिया करण्यात आली नसती तर संबंधित रुग्णाला पक्षाघात होण्याची शक्यता होती. त्याला श्वास घेण्यास त्रास झाला असता. तसेच मेंदूला रक्त पुरवठा करणाऱ्या नसलादेखील इजा होण्याची शक्यता अशा रुग्णांमध्ये असते. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती चांगली आहे.सुपरचे एमएस डॉ. अमोल नरोटे, एसडीओ डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली न्यूरोसर्जन डॉ. अमोल ढगे, डॉ. स्वरूप गांधी, डॉ. अभिजित बेले, डॉ. योगेश सावदेकर, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दीपाली देशमुख यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. यावेळी अधिसेविका माला सुरपाम यांच्या मार्गदर्शनाखाली इन्चार्ज सिस्टर ज्योती काळे, अभिजित नीचत, मनीषा रामटेके, जीवन जाधव, अभिजित उदयकर यांनीही शस्त्रक्रियेमध्ये डॉक्टरांना सहकार्य केले. सुपरचे



एमएस डॉ. अमोल नरोटे, एसडीओ डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली न्यूरोसर्जन डॉ. अमोल ढगे, डॉ. स्वरूप गांधी, डॉ. अभिजित बेले, डॉ. योगेश सावदेकर, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दीपाली देशमुख यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. यावेळी अधिसेविका माला सुरपाम यांच्या मार्गदर्शनाखाली इन्चार्ज सिस्टर ज्योती काळे, अभिजित नीचत, मनीषा रामटेके, जीवन जाधव, अभिजित उदयकर यांनीही शस्त्रक्रियेमध्ये डॉक्टरांना सहकार्य केले.

# जिजाऊ बँक अध्यक्षपदी अविनाश कोठाळे

## प्रदीप चौधरी उपाध्यक्ष, अविरोध झाली निवड



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** –जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्षपदी अविनाश कोठाळे यांची तिसर्यांदा निवड झाली आहे. प्रदीप चौधरी यांच्या गळ्यात उपाध्यक्षपदाची माळ पडली आहे. गुरूवार १८ जानेवारीला बँकेच्या सभागृहात ही निवडणूक अविरोध झाली. संचालक मंडळाच्या निवडणुकीत अविनाश कोठाळे व राजेंद्र जाधव यांच्या नेतृत्वातील जिजाऊ सहकार पॅनलने १५ पैकी १० जागा जिंकून बहुमत मिळविले होते. अरविंद गावंडे यांच्या नेतृत्वातल्या परिवर्तन पॅनलचे उमेदवार पाच जागांवर विजयी झाले होते. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदावर सहकार पॅनलचाच उमेदवार विजयी होईल, हे जवळपास निश्चितच होते. गुरूवारी दोन्ही पदाच्या निवडीसाठी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी बैठक बोलविली होती. विजयी पंधरा संचालक बैठकीला उपस्थित होते. सहकार पॅनलतर्फे अविनाश कोठाळे व प्रदीप चौधरी आणि परिवर्तन पॅनलकडून अनिल टाले व प्रशांत गांवडे यांनी अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी अर्ज सादर केला. छाननीनंतर अर्ज मागे घेण्याची वेळ देण्यात आली.

यावेळेत टाले व गांवडे यांनी अर्ज मागे घेतल्यामुळे अविनाश कोठाळे व प्रदीप चौधरी यांना अविरोध विजयी घोषीत करण्यात आले. संचालक बबन आवारे, श्रीकांत टेकाडे, नितीन डहाके, प्रा. अनिल बंड, डॉ. गौरव विधळे, पल्लवी बरब्दे, स्वप्नील वावरे, सुनील चाफले, अरविंद गावंडे, वैशाली गुडधे, राजेंद्र अढाऊ तसेच राजेंद्र जाधव, रामेश्वर विधळे, सुरेखा लुंगारे, सुरेंद्र दाळू यांच्यासह इतरांनी व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन वानखडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हरिष नाशिरकर यांच्यासह बँक कर्मचार्यांनी नवनिर्वाचीत अध्यक्ष व उपाध्यक्षांचे अभिनंदन केले.

# विद्यापीठात वन्यजीव प्रजाती ओळखण्यासाठी 'आण्विक जीवशास्त्र एक साधन' विषयावर

## राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बायोटेक्नॉलॉजी विभाग, पाटन (गुजरात) येथील वाईल्डलाईफ अ‍ॅन्ड कन्झर्वेशन बायोलॉजी रिसर्च फाऊंडेशन आणि मेळघाट टायगर रिझर्व्ह, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित वन्यजीव प्रजाती ओळखण्यासाठी 'आण्विक जीवशास्त्र एक साधन' या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक डॉ. प्रवीण चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, जीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, युथ फॉर नेचर कन्झव्हेशन ऑर्गनायझेशन, अमरावतीचे डॉ. स्वप्निल सोनोने यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यशाळेला देशभरातील प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांना या कार्यशाळेत प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी डॉ. प्रवीण चव्हाण म्हणाले, काळा बिबट व काळ्या वाघाची संख्या वाढत असून त्यांचे खरे कारण शोधायचे आहे. त्याकरीता जीवतंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. तसेच बिबट व इतर वन्य प्राण्यांनी मनुष्यासोबत जगायची सवय केलेली आहे, तर मनुष्याने सुध्दा वन्य प्राण्यांच्या जगण्याच्या सवयी ओळखून रहायची सवय करावी.

प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर यांनी वन्य प्राणी आणि प्रशिक्षणाचे महत्व सांगितले. कार्यशाळेचे संयोजक डॉ. प्रशांत ठाकरे यांनी जीवतंत्रज्ञानाचा वन्यजीव गुन्हे अन्वेषणात असलेले महत्व सांगितले. तसेच पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर यांनी वन्यजीवांच्या अभ्यासाकरीता अशाप्रकारच्या कार्यशाळेची आवश्यकता असल्याचे सांगितले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु. रेणुका येंडे, तर आभार डॉ. अनिता पाटील यांनी मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेकरीता कु. निलू सोनी, पुष्पा मांडवीय, योगेश बेले, रेणुका येंडे, प्रतिककुमार, सखी डाबी, डॉ. निशित कारिया यांनी परिश्रम घेतले.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार ह्या होत्या. यावेळी मेळघाट डी.एफ.ओ. श्री महेंद्र खैरनार, राजीव विकास जीवतंत्रज्ञान केंद्र, एल.आय.टी.यू. नागपूरचे संचालक डॉ. आरती शनवारे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. समारोप कार्यक्रमाचे संचालन पुजा मांडवीय, आभार निलू सोनी यांनी मानले.

# आझादनगरात 'हाफमर्डर', आरोपींकडून पोलिसांवर दगडफेक

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:–** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आझादनगर मैदानात तेथील एका ३७ वर्षीय तरूणाच्या डोक्यावर चाकुने सपासप वार करण्यात आले. त्याला मरणासन्न स्थितीत सोडून आरोपींनी तेथून पळ काढला. १७ जानेवारी रोजी रात्री ९.१५ च्या सुमारास ही घटना घडली. तेथे मोठा हलकल्लोळ माजला असता पोलीस देखील पोहोचले. पोलीस आरोपींना पकडण्यास गेले असता त्यातील एका महिलेसह सहा ते सात जणांनी पोलीस पथकाच्या दिशेने दगडफेक केली. पोलिसांना शिविगाळ देखील करण्यात आली. पोलिसांनी अतिरिक्त कुमक बोलावून तेथील तणावाची स्थिती आटोक्यात आणली. त्यात एक आरोपी पोलिसांच्या



तावडीत सापडला. तर अन्य पळून गेले. या हल्ल्यात अब्दुल सत्तार अब्दुल गफ्फार (३७, आझादनगर) हा गंभीर जखमी झाला. त्याच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी १८ जानेवारी रोजी सकाळी आरोपी सद्दाम उर्फ इरफान खान, अल्लू मामू, फिरोज लंबा, चिंटू व विकास चढार (सर्व रा. आझादनगर) यांच्याविरूध्द बेकायदशीर जमाव जमविणे, खुनाचा प्रयत्न, शिविगाळ केल्याचा गुन्हा दाखल केला. आरोपी व फिर्यादी एकाच मोहल्लूलात राहतात. अ. सत्तार हा



त्याच्या नातेवाईकाच्या घराजवळ आझादनगर ग्राऊंडमध्ये उभा असताना आरोपी तेथे आले. त्यांनी सत्तार याच्याकडे पाहून शिविगाळ केली. त्यावर त्याने जाब विचारला असता, सद्दामने त्याच्या डोक्यावर चाकुने वार केला. तसेच विकास व फिरोज यांनी देखील त्याच्या डोक्यावर वार केले. त्यामुळे अ. सत्तार हा रक्तबंबाळ होऊन तेथेच कोसळला. त्यानंतर जीवे मारण्याची धमकी देत आरोपी तेथून पळून गेले. सत्तारला जिल्हा सामान्य रूग्णालयात हलविण्यात आले.

### घटनेच्या दोन तासानंतर आरोपी पुन्हा घटनास्थळी

घटनेची माहिती मिळताच गाडगेनगरचे ठाणेदार गजानन गुल्हाने व पोलीस अंमलदार सुनिल बाजगिरे हे सहकाऱ्यांसह आझादनगर मैदानात पोहोचले. त्यावेळी रात्रीचे ९.२० वाजले होते. आरोपी हल्ला करून पळून गेल्याची माहिती त्यांना मिळाली. दरम्यान आरोपी पुन्हा घटनास्थळावर येऊ शकतात, या शक्यतेपोटी सुनिल बाजगिरे हे तेथे पेट्रोलिंग करत होते. रात्री ११ च्या सुमारास पोलीस जखमीच्या घराजवळ असताना दहा बारा महिला पुरूष तेथे मोठमोठ्याने शिविगाळ करीत आले. पैकी काहींनी ते सद्दाम, इम्रान, विकास हे आरोपी असल्याचे पोलिसांना सांगितले. ते समजताच बाजगिरे व पोकाँ प्रताप लोखंडे हे त्यांना पकडण्यासाठी धावले. त्यापुर्वी ते पळून जावेत, यासाठी काही आरोपींना पोलिसांसह तेथील उपस्थितांवर दगडफेक केली. त्यांचा पाठलाग करत असताना इम्रानखान पाय अडकून नालीत पडला. त्यावेळी अन्य आरोपींनी पुन्हा दगडफेक केली. त्यामुळे सर्व आरोपी पसार झाले. याप्रकरणी, बाजगिरे यांच्या तक्रारीवरून, सद्दाम, एक महिला, इम्रान खान, फिरोज लंबा, चिंटू व अन्य जणांविरूध्द शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला.

# हृदयविकार शस्त्रक्रियेसाठी इर्विनमधून दहा बालके सावंगी मेघेला रवाना

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अभियान



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** : हृदयविकाराचा त्रास असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील दहा बालकांना शस्त्रक्रियेसाठी सावंगी मेघे येथे पाठविण्यात आले आहे. मंगळवारी जिल्हा सामान्य रुग्णाल (इर्विन) येथून या बालकांना घेऊन रुग्णवाहिका रवाना झाली. या सर्व बालकांवर राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत मोफत शस्त्रक्रिया होणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या विविध आजारांचे वेळीच निदान करून आवश्यक शस्त्रक्रिया देखील केल्या जातात. २ जानेवारी रोजी इर्विनमध्ये हृदयाचा त्रास असलेल्या ९४ बालकांचे टू-डी इको करण्यात आले होते. यामध्ये ३० बालकांच्या हृदयाला छिद्र असल्याचे निदान डॉक्टरांनी केले होते. त्यामुळे या बालकांवर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय रुग्णालाय प्रशासनाने घेतला होता. त्याच अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांच्या मार्गदर्शनामध्ये यातील पहिल्या टप्प्यात दहा बालकांना मोफत शस्त्रक्रियेसाठी मंगळवारी सावंगी मेघे येथे पाठविण्यात आले आहे.

यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रीती मोरे यांनी शस्त्रक्रियेसाठी बालकांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला हिरवी झेंडी दाखविली. यावेही निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप हेडाऊ, आरबीएसके पर्यवेक्षक नीलेश पुनसे तेसच रुग्णालयातील इतर अधिकारी कर्मचारीही उपस्थित होते.

# १ कोटींची मर्यादा, बांधकाम ४ कोटींचें

# मजूर सहकारी संस्थेचा प्रताप

## चौकशीची मागणी

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक धारणी** –शासन परिपत्रकानुसार मजूर कामगार सहकारी संस्थांना एका वर्षात १ कोटी रुपयांपर्यंतचे कामे करण्याचे आदेश आहे. मात्र, अमरावती जिल्ह्यातील कित्येक मजूर संस्था हे एका वर्षात ४ कोटी रुपयांपर्यंत बांधकामांचे विविध कंत्राट नियमबाह्यरित्या जिल्हा उपनिबंधक विभागाच्या आशीर्वादाने घेत असल्यामुळे शासन आदेशाची पायमल्ली करणाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केल्या जात आहे. १ ते ४ कोटी रुपयांपर्यंतची कामे करणाऱ्या मजूर संस्थेतील पदाधिकारी खऱ्या मजुरांचे नावे मजुरी व्हाउचरवर खोट्या सह्या करून हजारो रुपयांची मजुरी हडप करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे.अमरावती जिल्ह्यात ११७ मजूर कामगार संस्थांची नोंद आहे. त्यात फक्त ५० संस्था कार्यरत असून त्यातही काही मजूर संस्था कागदोपत्री तयार केल्या आहेत. कित्येक सभासदांना आपण संस्थेत आहे किंवा नाही, हेसुद्धा माहिती नाही. त्यांना संस्थेत सभासद म्हणून कागदोपत्री दाखविले जात आहे. जिल्ह्यात कार्यरत ५० मजूर संस्थांची बँक पासबुक व कामे वाटप बुक मेंटेन करण्याची जबाबदारी तालुक्यासह जिल्हा उपनिबंधकांची असते. मात्र, गेल्या ५ वर्षांपासून मजूर संस्थांना जास्त जवळपास ४ कोटी रुपयांचे कंत्राट नियमबाह्यरित्या दिल्या जात आहे. यामध्ये जिल्हा निबंधक विभागात कामे वाटपात मोठ्या प्रमाणात कमिशनसुद्धा घेतल्या जात असल्याची चर्चा आहे. संस्थेला मिळालेल्या कोट्यवधींच्या प्रत्येक कामांवर संस्थेचे मजूर असणे आवश्यक आहे. मात्र, कामांवर संस्थेचे एकही मजूर नसतानाही त्यांचे नावे हजारो रुपयांची मजुरी काढल्या जात आहे. कामावर संस्थेचे मजूर आहे किंवा नाही, हे तपासण्याची जबाबदारी संबंधित कामांचे शाखा व उपविभागीय अभियंता यांची असते. तसेच मस्टरवर त्यांच्या नावाची नोंद घेऊन मजुरी वाटप करण्याचे कार्य केले जाते. मात्र, अशा कोणत्याही नियमांची अंमलबजावणी कुठेही होत नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे.

### त्या' मजुरांचे आलिशान बंगले, खरे मजूर झोपडीत?

*तालुका व जिल्हा उपनिबंधक कार्यालयात मजूर कामगार सहकारी संस्थेत मजूर सभासद म्हणून नोंद असलेल्या मजुरांकडे अलिशान बंगले, महागड्या कार दिसून येत आहे आणि आजही ते गर्भश्रीमंत मजूर शासनदप्तरी मजूर म्हणून संस्थेत कागदोपत्री कार्यरत आहे. मात्र, खरे मजूर आजही मजुरीपासून वंचित राहून झोपडीत राहत आहे. अशा गंभीर प्रकाराची सहकार सचिवांनी दखल घेऊन चौकशीची मागणी जोर धरत आहे.

### खऱ्या सभासदांच्या खोट्या स्वाक्षरीवर हजारो रुपयांची मजुरी हडपली

# कर चुकविण्यासाठी नंबर प्लेटच बदलविल्या

## दोन ट्रॅव्हल्सवर आरटीओची कारवाई

### लाखो रुपयांची कर चुकवेगिरी

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताजक अमरावती** –प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) अमरावती अंतर्गत असलेल्या वझ्झर नाक्यावर दोन ट्रॅव्हल बसेसला अधिकार्यांच्या पथकाने पकडले. या दोन्ही ट्रॅव्हस बसेस नंबर प्लेट बदलून धावत असल्याची गुप्त माहिती सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांना मिळाली असता त्यांनी वेळीच याची दखल घेऊन संपूर्ण अमरावती जिल्ह्यामध्ये आरटीओच्या चेक पोस्ट , चेक पॉईंट व भरारी पथकामार्फत या बसेसचा शोध घेण्याचे सांगितले होते.





या ट्रॅव्हल्स बसेस नागपूर मार्गे इंदोर येथे जाण्याकरिता निघाल्या होत्या; परंतु आरटीओच्या वझ्झर येथील नाक्यावर दोन्ही बसेसला अडवून कागदपत्राची मागणी केली असता वाहन चालकांनी दाखविलेले कागदपत्रे बनावट असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आल्यावर मोटार वाहन निरीक्षक दीपक मेहेरकर यांनी दोन्ही ट्रॅव्हल बसेसच्या वाहनचालकांना याबाबत विचारणा केली. त्यांनी कुठलीही माहिती समाधानकारक न दिल्याने भरारी पथकाचे मोटार वाहन निरीक्षक राजन सरदेसाई, गणेश वरूटे, सागर ठोसरे यांनी दोन्हीही ट्रॅव्हल बसेस ताब्यात घेऊन परतवाडा आगार बसस्थानक येथे जमा केल्या.दोन्ही ट्रॅव्हल बसेसच्या चेसिस नंबरवरून वाहनाचे निरीक्षण केले असता त्यातील एक ट्रॅव्हल बस एम पी १३ पी ३१७७ ही नंबर प्लेट लावून धावत होती. ती मुळात एम एच ४० ए टी ५४०० असल्याचे आढळून आले. हे वाहन प्रियंका बागडी, नागपूर यांच्या नावाने असल्याचे आढळून आले. दुसर्या वाहनावर युपी ९५ टी ४९६२ हा क्रमांक असून त्याची खातरजमा होत नसल्याने सदर वाहन कोणाच्या नावे आहे, याबाबत शोध सुरू आहे. पहिल्या वाहनावर ३१ ऑक्टोबर २०१७ पासून कर थकित असल्याचे निर्दर्शनास आले. दोन्ही ट्रॅव्हल बसेस इतर राज्यात वळती करण्यात येत होती काय, या बाबत शंका व्यक्त केल्या जात आहे.सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके व मोटार वाहन निरीक्षक दीपक मेहेरकर , राजन सरदेसाई , गणेश वरूटे, सहायक मोटार वाहन निरीक्षक सागर ठोसरे यांच्या कर्तव्यदक्षतेने दोन्हीही ट्रॅव्हल बसेसना अटकवून ठेवण्यात आले. ठढज ढ्ढ प्रादेशिक परिवहन अधिकारी राजाभाऊ गीते व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राज बागरी यांच्या मार्गदर्शनात पुढील कार्यवाही सुरू आहे.

# २२ जानेवारीला राम मंदिर उद्घाटन सोहळा, बँकांना सुट्टी राहणार का?

## पुढच्या आठवड्यात बँकांचं कामकाज किती दिवस?

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर पुढील आठवड्यात म्हणजे २२ जानेवारीला राम मंदिराचा उद्घाटन सोहळा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवर या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सहभागी होणार आहेत. दरम्यान, या सोहळ्यानिमित्त देशातील बँका बंद राहणार का? किंवा कोणत्या राज्यातील बँका बंद राहणार याबाबतची माहिती पाहुयात.



२२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. या पार्श्वभूमीवर अनेक राज्यांनी २२ जानेवारीला सुट्टी जाहीर केली आहे. उत्तर प्रदेशातही २२ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी म्हणजेच सरकारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यासंदर्भात शासनाकडून परिपत्रक जारी करण्यात आले आहे. २२ जानेवारीला म्हणजेच सोमवारी बँकांना सुट्टी असल्यामुळं पुढील आठवड्यात उत्तर प्रदेशात फक्त दोन दिवस बँका सुरू राहतील. २१ जानेवारीला रविवार असल्यानं देशभरातील बँका बंद राहणार आहेत. २२ जानेवारीला राम मंदिर उत्सवानिमित्त बँकेला सुट्टी असेल. त्यानंतर, मंगळवार, २३ जानेवारी आणि बुधवार, २४ जानेवारी रोजी बँकांमध्ये कामकाज होईल.

### अशा प्रकारे तुम्ही बँकिंगचे काम करू शकाल

बँकांना वारंवार सुट्ट्या आल्यानं सर्वसामान्यांना बँकेच्या कामकाजात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत ज्यांना आर्थिक कामे करायची आहेत, त्यांना ऑनलाइन सुविधांची मदत मिळणार आहे. या काळात लोक पैसे काढण्यासाठी एटीएम वापरू शकतात. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी तुम्ही णझख, नेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंग वापरू शकता. बँकांच्या मोबाईल आणि इंटरनेट बँकिंग सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहतील.

### सलग चार दिवस सुट्या

हजरत मोहम्मद अली यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, २५ जानेवारी रोजी बँकेला सुट्टी असणार आहे. त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त दुसर्या दिवशी म्हणजे शुक्रवार २६ जानेवारीला बँका बंद राहतील. २७ जानेवारी हा महिन्याचा चौथा शनिवार आहे आणि त्यानंतर २८ जानेवारी रविवार आहे. २५ जानेवारी ते २८ जानेवारी असे सलग चार दिवस बँका बंद राहणार आहेत. २१ जानेवारीपासून पुढील आठ दिवस बँका फक्त २ दिवस सुरू राहतील आणि ६ दिवस सुट्या असतील.

**सुट्टीबाबत सोशल मीडियावर एक परिपत्रक** – २२ जानेवारीला बँक सुट्टीबाबत एक परिपत्रक सोशल मीडियावर शेअर केले जात आहे. परिपत्रकात असे म्हटले जात आहे की निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट १८८१ अंतर्गत २२ जानेवारीला उत्तर प्रदेशमध्ये सर्व बँका बंद राहतील. म्हणजेच २२ जानेवारीला सरकारी बँकांसह खासगी बँकाही बंद राहतील.

### 'या' दिवशी बँका राहणार बंद

२१ जानेवारी २०२४– रविवारमुळे देशभरातील बँकांना सुट्टी असेल

२२ जानेवारी २०२४– इमोइनू इराप्टामुळे इम्फाळमध्ये बँका बंद राहतील, तसेच उत्तर प्रदेशमध्ये राम मंदिर उद्घाटन सोहळ्यामुळं बँका बंद राहतील.

२३ जानेवारी २०२४– इंफाळमध्ये गाणे आणि नृत्यामुळे बँकेला सुट्टी असेल.

२५ जानेवारी २०२४– थाई पोशम/हजरत मोहम्मद अली यांच्या वाढदिवसानिमित्त चेन्नई, कानपूर आणि लखनऊ येथील बँकांना सुट्टी असेल.

२६ जानेवारी २०२४– प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभरात बँका बंद राहतील.

२७ जानेवारी २०२४– चौथ्या शनिवारमुळे देशभरातील बँकांना सुट्टी असेल.

२८ जानेवारी २०२४– रविवारमुळे बँक बंद राहणार आहे.

# महिला धुरकर्यांनी गाजवला शंकरपट

## येवतीच्या लक्ष्मी सोनवणेंची जोडी प्रथम

### तळेगाव दशासर येथे भव्य आयोजना

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक तळेगाव दशासर, –** कृषक सुधार मंडळद्वारा आयोजित शंकरपटात गुरूवार १८ जानेवारीला महिला धुरकरणी पटात बैलजोडी घेऊन उतरल्या. हा पट त्यांनी चांगलाच गाजवला. पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होती. येवतीच्या लक्ष्मी सोनवणेंची जोडी प्रथम आली. महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत, हे चित्र येथे पाहायला मिळते. महिला पटाचे सर्व संचालन महिलाच करतात, हे विशेष.सुमारे २० वर्षापुर्वी कृषक सुधार मंडळाचे रावसाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून हा पट सुरु करण्यात आला. गुरुवारच्या महिला आरक्षित बैलजोडी स्पर्धेत सर्व प्रथम महिला धुरकरणींचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आले.पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी सुद्धा तुफान व वेगवान जोड्या हाकल्या. या पटामध्ये लक्ष्मी गजानन सोनवणे रा. येवती ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती यांच्या शेर्या – शंभु यांच्या बैलजोडीने ११.८७ सेकंद वेळात अंतर पूर्ण करून प्रथम क्रमांक पटकाविला तर सीमा पाटील रा. कोल्ही ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ यांच्या बब्बर – बादशाह या जोडीने ११.८९ सेकंद या वेळात अंतर पार करून द्वितीय तर गोजिरी सुशील शिंदे रा. कोल्ही ता. बाभुळगाव जि. यवतमाळ यांच्या तिरंगा – चार्ली या बैल जोडीने १२.३० सेकंद या वेळात अंतर पूर्ण करून तृतीय स्थान प्राप्त केले.



या स्पर्धेचे उद्घाटन कृषक सुधार मंडळाच्या सदस्य पुष्पा देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी शुभांगी देशमुख, उत्तरा जगताप, शोभा तडस, सरपंच मीनाक्षी ठाकरे, अनिता मेश्राम, मंजुषा जाधव, सुमन बेले, सीमा कुळकर्णी, राधिका देशमुख, संध्या डेहनकर, भारती चुटे, संगीता गवळी, सरला थोरात, माधुरी तडस, दीपाली तडस तसेच सर्व महिला ग्रामपंचायत सदस्या व मोठया संख्येने महिला प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

# ते गाडी करून आले, एक पोरगा टपावर चढला; अन् झळकवला सरकारविरोधी बॅनर!

## शेतमालाला भाव नसल्याचा संताप

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात गुरुवारी अचानक काही युवक दुपारच्या सुमरास एका वाहनाने आले. त्यांनी यावेळी रत्यावरच आपले वाहन थांबून एक युवक हातामध्ये केंद्र सरकार विरोधातील बॅनर घेवून या वाहनावर चढला आणि केंद्र सरकारविरोधात नारेबाजी करायला सुरुवात केली. अचानक घडलेल्या या सर्व प्रकारामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. केंद्र सरकारचे धोरण हे शेतकरी विरोधी असल्याने शेतमालाला भाव नसल्याचा संताप यावेळी या युवकांनी व्यक्त केला.





केंद्र सरकारने नवनवीन आयात निर्यात धोरण आणून शेतीमालाचे भाव पाडण्याचा धंदा सुरु केल्याचा अरोप आंदोलनकर्ता युवकांनी केला आहे. केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे आज देशभरातील शेतकरी संकटात असून आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची कर्ज माफी नको, वार्षिक ६ हजार रुपयांची मदतही नको. त्यांना फक्त त्यांच्या शेतमालाला भाव मिळावा तसेच शेतकऱ्यांची होणारी लूट थांबावी अशी मागणी यावेळी आंदोलनातून युवकांनी केली. या आंदोलनामध्ये नीतीन मोकलकर, दिपक वानखडे, तेजस मोकलकर, सुशांत मालधुरे, सोमेश जोंधळे या युवकांचा सहभाग होता.

# भीषण आगीत २५ चारचाकी वाहने भस्मसात

## वरूड शहरातील 'पिंटू मोटर्स'ला आग

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक वरूड –** शहरातील पांढुर्णा रोडवरील राजेश खेरडे यांच्या मालकीच्या जागेत असणार्या पिंटू उर्फ मुकेश कवटकर रा. वरूड यांच्या 'पिंटू मोटर्स' नामक गॅरेजला बुधवार १८ जानेवारी रोजी रात्री १.३० वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागून त्यात २५ वाहने जळाल्याचे प्राथमिक वृत्त आहे.

आग लागल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली होती.पोलिसांनी तात्काळ याबाबत वरूड व शेंदूरजनाघाट नगरपरिषदेतील अग्निशमन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन विभागाकडून शर्तीचे प्रयत्न करण्यात आले. सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर अग्निशमन विभागाला आग विझवण्यात यश मिळाल्याची माहिती अग्निशमन विभाचे अधिकारी हर्षल दहाट यांनी दिली. परंतु तोपर्यंत या आगीत गॅरेजच्या आजुबाजुला दुरूस्तीसाठी असणारी २५ चारचाकी वाहने व गॅरेजमधील साहित्य जळून खाक झाले आहे. एकूण दीड कोटीचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.



या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वरूड पोलिसांनी सुद्धा घटनास्थळी धाव घेत पहाणी केली.आगीचे भीषण स्वरूप पाहता गॅरेज मालक पिंटू कवटकर यांना घटनास्थळीच भोवळ आली. त्यामुळे त्यांना शहरातील गोदने रुणालयात दाखल करण्यात आल्याचीही माहिती मिळाली आहे. आगीचे स्वरूप लक्षात घेता ही आग कुण्यातरी अज्ञाताकडुन लावल्या गेल्याची चर्चा घटनास्थळावर जोर धरत आहे. पोलिसांकडून गुरवारी दुपारी पंचनामा करण्यात आला.


पाहिजेत

विदर्भ प्रजासत्ताक

सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क– prajasattaknews24gmail.com

# वाहनचालकांनो, 'फास्टॅग'ची केवायसी करा अन्यथा ब्लॅकलिस्ट, एनएचएआयचे आवाहन

## एनएचएआयकडून 'एक वाहन, एक फास्टॅग' याअंतर्गत नियोजन




**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

एनएचएआयकडून 'एक वाहन, एक फास्टॅग' याअंतर्गत फास्टॅगद्वारे टोल वसुली सुलभरीत्या होण्यासाठी वाहनचालकांनी आपल्या वाहनाच्या फास्टॅगची केवायसी ३१ जानेवारी २०२४ पर्यंत करून घ्यावी अन्यथा फास्टॅग निष्क्रिय केले जातील किंवा ब्लॅकलिस्ट केले जातील, असे आदेश राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

एनएचएआयकडून 'एक वाहन, एक फास्टॅग' याअंतर्गत याचे नियोजन केले आहे. अनेक वाहनचालक एकच फास्टॅग अनेक वाहनचालकांना वापरत असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने एक फास्टॅग एकाच वाहनाला वापरण्यात यावा, यासाठी शासनाने केवायसी करणे बंधनकारक केले आहे.

एनएचएआय'ने निवेदनात म्हटले की, वाहनचालकांनी आपल्या वाहनाच्या फास्टॅगची कागदपत्र केवायसी झाली आहे की, नाही याची खातरजमा करावी. केवायसी केली नसेल तर ३१ जानेवारीच्या आत ती करून घ्यावी. अन्यथा ३१ जानेवारी २०२४ नंतर ज्या फास्टॅगची केवायसी केलेली नसेल तर तो फास्टॅग निष्क्रिय केला जाईल, अन्यथा ब्लॅक लिस्ट करण्यात येणार आहे. यामुळे वाहनमालकांनी केवायसी खातरजमा करावी, असे आवाहन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

# महापालिकेच्या निवडणुका लांबल्या हवसे- गवसे अन नवसेही हिरमुसले

**अरुण जोशी**

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

साधारणतः लोकसभा निवडणुकीची चाहूल लागल्यानंतर महानगरपालिका, नगर परिषदेच्या निवडणुका वर्षभर पुढे जाणार असल्याने अमरावती शहरात, जिल्ह्यात राजकीय हालचालींना ब्रेक लागला आहे. दुसरीकडे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या इच्छुकांचा भ्रमनिरास झाल्याने ते इच्छुक ही आता पूर्णपणे हिरमुसले आहेत. कधी एकदाचं निवडणुका जाहीर होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये पालिका पदाधिकाऱ्यांचा सेवकाळ संपला. ही मुदत संपण्यापूर्वी म्हणजे फेब्रुवारी २०२२ मध्ये निवडणुका होऊन नवीन नगरसेवक निवडल्या जाणे अपेक्षित होते. परंतु आरक्षणासह इतर काही मुद्द्यांमुळे पालिकेची निवडणूक रखडली. दोन महिन्यांत होईल, चार महिन्यांत होईल, या महिन्यात होईल, असे म्हणता म्हणता दोन वर्षांचा कालावधी पूर्ण होत आहे.



परिणामी अमरावती शहरात नागरिकांना लहानसहान कामांसाठी त्रास सहन करावा लागत आहे. नगर पालिकेमधून एखादा दाखला, नोंदणी, परवाना, प्राथमिक सोयी सुविधांची कामे, कोणत्याही कामांसाठी नागरिकांना स्वतः नगरपालिकेच्या चकरा माराव्या लागत आहेत.

नगरसेवक असताना एका फोनवर नागरिकांची कामे होत असायची. परंतु आता नगरसेवक नसल्याने नागरिकांची कामे वेळेवर होत नाहीत. कुठे पथदिवे तर कुठे नळाला पाणीपुरवठा अनेक दिवस बंदच असते. कुठे अनेक दिवसपर्यंत साफसफाई होत नाही. कुठे कचरा साचतो, काही ठिकाणी मोकाट जनावरांचा त्रास आहे. या सर्व बाबींसाठी संपर्क करायचा कुणाकडे? असा गंभीर प्रश्न नागरिकांसमोर आहे.

### विकासकामांना ब्रेक

महानगरपालिका निवडणुका लांबणीवर गेल्याने प्रशासकांची विक्रमी कारकीर्द घडली. याचा परिणाम शहरातील विकासकामांवर होताना दिसून येत आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने विकासकामांचा निधी पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध होत नाही. रस्ते, नाली या व्यतिरिक्त अन्य कोणतेही विकासकामे पाहायला मिळत नाही.

### जनसेवेसाठी माघार

फेब्रुवारी २०२२ मध्ये निवडणुका होणार या आशेने अनेक इच्छुकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून मोठ्या जोमाने निवडणुकीची तयारी सुरू केली होती. परंतु निवडणुका जस जशा लांबत गेल्या तस-तसे इच्छुकही हिरमुसले. आता निवडणुका कधी होतील हे कुणालाही माहीत नसल्याने इच्छुक उमेदवारही जनसेवेसाठी पुढाकार घेत नसल्याचे दिसून येते.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावतीच्या पोटेन्शियल नियतकालिकेच्या मुखपृष्ठाचे अनावरण

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महाविद्यालयीन नियतकालिकेच्या स्पर्धेमध्ये गेले तीन वर्ष सातत्याने प्रथम क्रमांक मिळवलेला आहे. या वर्षी होणाऱ्या महाविद्यालयीन नियतकालिकेच्या स्पर्धेमध्ये भारताला चंद्रयान ३ आणि आदित्य एल१ मध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशाला साजेशे सर्जनशीलता आणि शैक्षणिक पराक्रम दाखवणा-या मुखपृष्ठ महाविद्यालयात घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या स्पर्धेतून निवडले गेले . या मुखपृष्ठेचे अनावरण श्री. पंकज किल्लेदार इस्रोचे शास्त्रज्ञ, प्रेरक वक्त्या जया किशोरीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या मुखपृष्ठात त्यांनी अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रातील अंतदृष्टी सामायिक केली आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात ताऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रोत्साहित केले. इस्रो सोबतचे सहकार्य हे कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये नावीन्य आणि वैज्ञानिक भावना वाढवण्याच्या वचनबद्धतेचे पूरक आहे. या मुखपृष्ठाची रचना इस्रो बद्दलचे संस्थात्मक समर्पण दर्शवते.यात विद्यार्थ्यांची उपलब्धी, संशोधनाचे प्रयत्न आणि कलात्मक अभिव्यक्ती ठळक करणारे लेख आहेत.




पंकज किल्लेदार यांनी विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे कौतुक केले आणि त्यांना प्रोत्साहित केले. वर्षीचे नियतकालिका महाविद्यालयाने इस्रोच्या अभूतपूर्व यशाबद्दल शास्त्रज्ञाना समर्पित केले. पोटेन्शियल नियतकालिकाला प्रसिध्दी करिता प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले , उपप्राचार्य डॉ मो. झुहेर व सर्व विभाग प्रमुख यांनी शुभेच्छा दिल्या तसेच स्टुडन्ट वेलफेरे डीन च्या डॉ. एस. के नंदा, तसेच संयोजक प्रा योगेश बनसोड, प्रा.अमरीन अली, डॉ स्वाती चौधरी यांनी या पोटेन्शियल नियतकालिका करीता परिश्रम घेतले.

# लाभ नाकारण्यासाठी गिव्ह इट अप सबसिडी या पर्यायाचे बटण

## विद्यार्थ्यांनो, यावर करू नका क्लिक; मिळणार नाही कुठलीच शिष्यवृत्ती

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्र शासनाने राबविलेल्या गिव्ह इट अप एलपीजी सबसिडी या उपक्रमाप्रमाणे लाभ नाकारण्याचा पर्याय महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार या पर्यायाचे बटण महाआयटीमार्फत विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे चुकूनही या बटणावर विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना क्लिक केले तर त्याला शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागू शकते.




गिव्ह इट अप सबसिडी या पर्यायाची निवड केल्यानंतर निवडीबाबतच्या खात्रीकरिता पॉप अप-विंडोमध्ये सूचना येईल. सूचना मान्य केल्यानंतर मोबाइलवर ओटीपी येईल. यात वेबसाइटवर नोंदविल्यानंतर गिव्ह इट अप सबसिडीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. मात्र, शिष्यवृत्ती सर्वसामान्य, अल्प उत्पन्न, कुटुंबातीलच विद्यार्थ्यांना मिळते त्यामुळे या पर्यायाची आवश्यकताच नसल्याचे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे राज्य शासनाने महाडीबीटी पोर्टलवरून गिव्ह इट अपचा पर्याय काढल्यास विद्यार्थ्यांना अधिक सोयीचे होईल.

शिष्यवृत्ती गरजू विद्यार्थ्यांसाठीच असते. त्यासाठी शासनाने आर्थिक निकष आधीच लावले आहे. त्यामुळे गिव्ह इट अपचा पर्यायाची गरज नाही. शासनाने हा पर्याय दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ होत आहे. या पर्यायामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पर्यायाने शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. शासनाने हा पर्याय काढून टाकावा.

**प्रा.संजय शेंडे**

# मालमत्ता करवाढीविरोधात काँग्रेसचं हल्लाबोल आंदोलन

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती महानगरपालिका कडून मालमत्ता करवाढ विरोधात आता अमरावती काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली.. अमरावती महानगरपालिकेच्या पाचही झोन कार्यालयावर आज काँग्रेसने सर्वसामान्य नागरिकांना घेऊन हल्लाबोल आंदोलन केले..यावेळी पाचही महानगरपालिका झोन कार्यालयावर काँग्रेस नेते तथा माजीमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हल्लाबोल आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी देत निषेध केला... अमरावती शहरात अतिरिक्त मालमत्ता कर लागू केल्याने काँग्रेस सोबतच अनेक संघटनेने आंदोलन केले पण अद्यापही त्यावर काही निर्णय न झाल्याने काँग्रेस पुन्हा आक्रमक झाली.. अतिरिक्त लागू केलेला मालमत्ता कर रद्द करण्याची मागणी यावेळी आंदोलकांनी केली.. सोबतच येणाऱ्या सात दिवसात मालमत्ता करवाढ रद्द केली नाहीतर यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेस नेत्यांनी दिला.हल्लाबोल आंदोलनात विविध परिसरातील नागरिकांनी सहभाग घेतला.मालमत्ता कराच्या वाढीला नागरिकांकडून तीव्र विरोध करण्यात आला.भारतीय जनता पक्ष व महानगरपालिका प्रशासन यांच्या विरोधात नागरिकांद्वारे प्रचंड नारेबाजी करण्यात आली.भारतीय जनता पक्षाचा निषेध असो,मनपा प्रशासन मुर्दाबाद,वाढीव मालमत्ता कराची दरवाढ रद्द झालीच पाहिजे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. वाढीव मालमत्ता कर विरोधात हल्लाबोल आंदोलनामध्ये नागरिकांनी वाढीव मालमत्ता कर रद्द झाल्याशिवाय येथून न हटण्याची मागे देखील ग्राह्य धरली होती.कोणत्याही परिस्थितीत सत्ताधारी भाजप व त्यांच्या सर्व मित्र पक्षांनी मिळून मालमत्ता करवाढीची केलेली रद्द करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.यावेळीकाँग्रेस पक्षाचे नेते डॉ.सुनील देशमुख,शहर काँग्रेस अध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर,प्रदेश सचिव आसिफ तवक्कल तसेच काँग्रेस पक्षाचे सर्व ज्येष्ठ पदाधिकारी व माजी नगरसेवक उपस्थित होते.



# धानाचे पोती नेणारा ट्रक उलटला

**दि. १९ विदर्भ प्रजासत्ताक गोंदिया :**
गोंदिया-कोहमारा मार्गाने धानाचे पोते भरून ट्रक जात होता. ट्रकच्या मागे वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांचे चारचाकी शासकीय वाहन येत होते. ते वाहन बघून भरधाव वेगात ट्रक चालवित असताना नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या खाली जाऊन उलटला. या अपघातात ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तर चालक गंभीर जखमी झाला. ही घटना भडंगा गावाजवळ घडली.




# सावधान ! ग्रामीण भागात महिलांचा खर्रा खाण्याचा आलेख वाढतोय

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी/ वरुड**

ग्रामीण भागात गुटखा व खर्रा खाण्याचे प्रमाण वाढत असून ग्रामीण भागातील महिला याकडे वळल्याचे चित्र दिसायला लागले आहे. भविष्यात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आरोग्यास हानिकारक असल्याने मुख कॅन्सर होण्याची शक्यता बळावली आहे. यात कष्ट करणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कुटुंबाची प्रमुख भूमिका बजावणारी महिला खर्राच्या विळख्यात ओढली जाणे, ही चिंतेची बाब ठरू पाहत आहे.



चूल आणि मूल एवढेच सीमित असणाऱ्या महिला आजच्या स्थितीतविविध क्षेत्रात विविध पदांवर आरूढ होत आहेत. शहरी महिलांच्या बरोबरीने ग्रामीण महिलादेखील सामाजिक उपक्रमात सहभागी होऊ सक्षम होताना दिसत आहेत. मात्र ग्रामीण भागातील काही महिला गुटखा व खर्राच्या सेवनाकडे वळल्याने त्यांचे आयुष्य टांगणीला लागले असल्याचे चित्र मूल तालुक्यात दिसत आहे.

सध्या ग्रामीण भागात अनेक महिला खर्राच्या आहारी गेल्याचे वास्तव चित्र आहे. ग्रामीण भागात वॉर्ड तिथे पानठेला अशी स्थिती बघायला मिळत आहे. त्यामुळे घरातील कर्ता पुरुष आपल्या मुलांना पाठवून खर्रा बोलावून घेत असतो. त्या खर्राची कशी चव असते, हे बघण्यासाठी प्रथम प्रयत्न केला जातो. कालांतराने त्या आहारी जातात. एकदा लागलेली सवय तोडणे कठीण असल्याने ते पूर्णतः आहारी जातात. त्यामुळे मुख कॅन्सरसारखे आजार होण्याची शक्यता आहे. यापासून परावृत्त होणे गरजेचे आहे.